प्रातःकाल
www.pratahkal.com

## संपादकीय

# युद्धाचा विळखा आणि इंधन टंचाई

पश्चिम आशियातील भू-राजकीय तणाव आणि अमेरिका-इस्त्रायल विरुद्ध इराण यांच्यातील युद्धाने आता केवळ भौगोलिक सीमा ओलांडलेल्या नसून, या युद्धाच्या भीषण झळा थेट सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघरापर्यंत येऊन ठेपल्या आहेत. युद्धाला १४ दिवस उलटले असताना जागतिक इंधन पुरवठा साखळी पूर्णपणे विस्कळीत झाली असून, त्याचा सर्वाधिक फटका भारतासारख्या आयातीवर अवलंबून असलेल्या देशाला बसत आहे. सध्याच्या परिस्थितीत गृहोपयोगी गॅस सिलिंडरपेक्षाही व्यावसायिक सिलिंडरचा तुटवडा कमालीचा भासत असून, यामुळे देशातील हॉटेल व्यवसाय, सार्वजनिक संस्था आणि अगदी देवस्थानातील प्रसादाचे वितरणही संकटात आले आहे. जागतिकीकरणाच्या या युगात जगाच्या एका कोपऱ्यात पेटलेली युद्धाची ठिणगी आपल्या ताटातील अन्नावर कशी गदा आणू शकते आणि सामान्यांचे जगणे कसे मुश्कील करू शकते, याचे हे अत्यंत विदारक दर्शन आहे. आंतरराष्ट्रीय घडामोडींचे पडसाद स्थानिक पातळीवर इतक्या वेगाने आणि तीव्रतेने उमटतील, याची पुसटशी कल्पनाही कोणाला नव्हती.

या संकटाचा सर्वाधिक फटका कर्नाटक आणि बेंगळूरसह मुंबई, दिल्लीसारख्या महानगरांना बसला आहे. देशभरातील बहुतेक जिल्ह्यांत व्यावसायिक सिलिंडरच्या पुरवठ्यात ५० टक्क्यांहून अधिक कपात करण्यात आली आहे. या कपातीमुळे व्यावसायिक सिलिंडरची उपलब्धता कमालीची घटली असून, अनेक हॉटेल व्यावसायिकांवर आपली दुकाने कायमची बंद करण्याची वेळ आली आहे. ज्यांचे व्यवसाय कसेबसे सुरू आहेत, त्यांना आपल्या मेनूकार्डमध्ये मोठे बदल करावे लागले आहेत. गॅसची उपलब्धता आणि साठा पाहूनच केवळ मर्यादित आणि सोपे पदार्थ ग्राहकांना उपलब्ध करून दिले जात आहेत. आश्चर्याची आणि खेदाची बाब म्हणजे, गॅसअभावी अनेक ठिकाणी पुन्हा चुलीवर स्वयंपाक करण्याची वेळ आली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात आपण प्रगतीकडून पुन्हा एकदा अधोगतीकडे मागे जात आहोत की काय, अशी भीती या निमित्ताने वाटू लागली आहे.

केवळ व्यावसायिकच नव्हे, तर सामाजिक बांधिलकी जपणारे घटकही या टंचाईच्या कचाट्यात सापडले आहेत. अनेक सामाजिक संस्था, वृद्धाश्रम आणि विद्यार्थी वसतिगृहांमध्ये दररोज शेकडो लोकांचे जेवण बनवले जाते. आता व्यावसायिक गॅस मिळत नसल्याने तिथे अन्न शिजवायचे कसे, असा गंभीर यक्षप्रश्न व्यवस्थापनासमोर उभा ठाकला आहे. सीएनजीचा साठाही वेगाने संपत आल्याने रिक्षाचालक आणि सीएनजीवर चालणाऱ्या वाहनधारकांसमोर रोजगाराचे मोठे संकट उभे राहिले आहे. ऑटोरिक्षा चालकांना गॅससाठी तासनतास रांगेत उभे राहावे लागत आहे आणि तरीही गॅस मिळेलच याची खात्री नसल्याने अनेकांची रोजीरोटी धोक्यात आली आहे. कर्नाटकातील प्रसिद्ध देवस्थानांमध्ये दररोज हजारो भक्तांना मिळणाऱ्या प्रसाद वितरणावरही या टंचाईचा मोठा परिणाम झाला असून, प्रसादाची पाकिटे मर्यादित करावी लागली आहेत.

सध्या लग्नसराईचा मोठा हंगाम सुरू आहे. अनेक मंगल कार्यालये आणि कल्याण मंडपांमध्ये लग्नाचे जेवण बनवण्यासाठी व्यावसायिक गॅसची मोठ्या प्रमाणावर गरज भासते. मात्र, गॅसचा पुरवठा ५० टक्क्यांनी कमी झाल्याने केटरर्सची मोठी ओढाताण होत आहे. परिस्थितीचे गांभीर्य पाहून साठेबाज आणि काळाबाजार करणारे घटक कमालीचे सक्रिय झाले आहेत. हे साठेबाज या टंचाईचा गैरफायदा घेऊन झटपट पैसा कमावण्याच्या नादात कृत्रिम टंचाई निर्माण करत असून समाजस्वास्थ्याला सुरुंग लावत आहेत. अशा वेळी सामान्य जनतेची लूट थांबवणे हे सरकारपुढील सर्वात मोठे आव्हान आहे. कर्नाटकचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री के. एच. मुनियप्पा यांनी तेल कंपन्यांच्या प्रतिनिधींची तातडीची बैठक घेऊन कोणत्याही परिस्थितीत घरगुती सिलिंडरचा पुरवठा खंडित होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या कडक सूचना दिल्या आहेत. तसेच शाळा, महाविद्यालये आणि रुग्णालयांना व्यावसायिक सिलिंडर पुरवठ्यात पहिले प्राधान्य देण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत.

गॅस सिलिंडरचा हा घोळ आणि टंचाई सुरू होण्यापूर्वीच घरगुती वापराच्या सिलिंडरची दरवाढ जाहीर झाली होती, ज्यामुळे आधीच महागाईने होरपळलेल्या जनतेला मोठा धक्का बसला होता. या मुद्द्यावरून आता राजकारणही तापले आहे. कर्नाटक सरकारने या भीषण स्थितीला केंद्र सरकारचे 'अस्पष्ट आणि धरसोड परराष्ट्र धोरण' जबाबदार असल्याचा थेट आरोप केला आहे. विधिमंडळात यावर खडाजंगी चर्चा होताना सत्ताधारी काँग्रेसने केंद्रावर देश चालवण्यात अपयशी ठरल्याची टीका केली. मंत्र्यांनी विधानसभेत सांगितले की, परराष्ट्र धोरणातील चुकांमुळे इंधन आणि गॅस पुरवठा ठप्प झाला आहे. दुसरीकडे, भाजपने हे जागतिक संकट असल्याचे सांगून केंद्र सरकारचा बचाव करण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी केंद्रीय मंत्री हरदीपसिंग पुरी यांना पत्र लिहून एलपीजी उत्पादन वाढवण्याची आणि पुरवठा साखळी सुरळीत करण्यासाठी तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

कोरोना महामारीच्या दीर्घकालीन संकटानंतर छोटे उद्योग आणि हॉटेल व्यवसाय आता कुठे रूळावर येत होते. मात्र, या युद्धाच्या सावटाने पुन्हा एकदा त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण केला आहे. जर पुढच्या आठवडाभरात परिस्थिती सुधारली नाही, तर देशातील सुमारे ३५ टक्क्यांहून अधिक हॉटेल व्यवसाय आणि खानावळी कायमच्या बंद होण्याच्या मार्गावर आहेत. सरकार जरी वारंवार सांगत असले की घरगुती सिलिंडरची कमतरता नाही, तरीही एका कुटुंबाला महिन्यातून किमान एक सिलिंडर उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाची दमछाक होत आहे. गरिबांसाठी सुरू असलेल्या 'इंदिरा कँटीन'मध्येही खाद्यपदार्थ तयार करणे गॅसअभावी बंद करण्यात आल्याने कष्टकरी वर्गाचे मोठे हाल होत आहेत.

अमेरिका, इस्त्रायल, युक्रेन आणि इराणमधील संघर्षाचा परिणाम केवळ राजनैतिक संबंधांवर होत नाही, तर तो गरिबाच्या ताटापर्यंत पोहोचतो, याचे हे ताजे उदाहरण आहे. साठेबाजी आणि काळाबाजार रोखण्यासाठी पोलीस आणि नागरी पुरवठा विभागाने अत्यंत कठोर आणि सतर्क राहण्याची गरज आहे. केवळ बैठका घेऊन किंवा पत्रव्यवहार करून प्रश्न सुटणार नाही, तर जमिनीवर प्रत्यक्ष पुरवठा कसा वाढवता येईल, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. संकटाचा फायदा घेऊन कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर मोक्कासारखी कडक कारवाई करणे अपेक्षित आहे. जनतेनेही या परिस्थितीत घाबरून न जाता संयम राखणे आणि गॅसचा वापर अत्यंत काटकसरीने करणे आवश्यक आहे, कारण हा केवळ स्थानिक प्रश्न नसून तो एक जागतिक पेचप्रसंग आहे.

अखेर, कोणत्याही आंतरराष्ट्रीय युद्धाचे फलित हे केवळ विनाशातच असते, याची प्रचिती आता सामान्यांना येत आहे. पश्चिम आशियातील हे युद्ध जर आणखी लांबले, तर परिस्थिती हाताबाहेर जाण्याची भीती आहे. मागणी आणि पुरवठा यांच्यात योग्य ताळमेळ बसवणे हे सरकारचे मुख्य कर्तव्य आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींवर सध्या तरी परिणाम झाला नसला, तरी गॅस टंचाईने अनेक उद्योग-व्यवसायासमोर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. केंद्र आणि राज्य सरकारांनी राजकीय मतभेद बाजूला सारून समन्वयाने या संकटावर मात करणे गरजेचे आहे. सामान्य माणसाला युद्ध नको असते, त्याला शांतता आणि पोटाची भूक भागवण्यासाठी लागणारे इंधन हवे असते. ही लोकशाही व्यवस्थेची जबाबदारी आहे की, जागतिक वणव्यात आपल्या नागरिकांची चूल विझणार नाही, याची काळजी घेतली जावी.

# युद्धाची धग सर्वसामान्यांच्या स्वयंपाकगृहात

❒ – श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा, पुणे.



अमेरिका आणि इराण या देशांनी इराणवर केलेल्या हल्ल्याला बारा दिवस उलटले तरी हे युद्ध थांबायचे नाव घेत नाही. हे युद्ध जरी आखातात सुरू असले तरी त्याची झळ जगाला बसणार असे मी माझ्या 'आखातातील युद्धाची जगाला झळ' या लेखात लिहिले होते. या युद्धाची झळ जगाला जशी बसतेय तशीच भारतालाही बसत आहे आणि युद्धाच्या या धगीत देशातील सर्वसामान्य नागरिकांची ससेहोलपट होत आहे. या युद्धाची धग आता भारतीयांच्या स्वयंपाक घरांमध्येही बसू लागली आहे. इराण अमेरिका युद्धामुळे देशात गॅस तुटवडा निर्माण झाला असल्याने गॅस वितरक कंपन्यांच्या कार्यालयांपुढे नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. स्वयंपाकाचा गॅस ही जीवनावश्यक गरज आहे. जर हे युद्ध आणखी काही दिवस चालले तर स्वयंपाकाला गॅस मिळणार नाही अशी भीती सर्वसामान्य नागरिकांमध्ये पसरली झाली असल्याने जो तो गॅस मिळवण्याचा प्रयत्न करत आहे त्यासाठी तासंतास रांगेत उभे राहून गॅस पदरात पाडून घेण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे. सरकार सर्वसामान्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न करीत असले तरी टीव्ही वरील बातम्या पाहून सर्वसामान्यांच्या चिंतेत भरच पडत आहे. त्यात सरकारने गॅसच्या दरात ६० रुपये इतकी घसघशीत दरवाढ केल्याने भविष्यात गॅसचे दर आणखी वाढेल अशीही भीती निर्माण झाली आहे. सरकारने घरगुती गॅसला प्राधान्य देण्यासाठी व्यावसायिक सिलेंडरचे बुकिंग थांबवले आणि एकंदर बुकिंगची मुदत २५ ते ३० दिवसांवर नेण्यात आली त्यामुळे नागरिकांच्या घबराटीत भरच पडली आणि सगळीकडून एकाच वेळी नोंदणीचे सत्र सुरू झाले. एकाच वेळी सगळीकडून नोंदणी होऊ लागल्याने नोंदणीत अडचणी येऊ लागल्या त्यामुळे नागरिक आणखी हवालदिल झाले. सर्वसामान्य नागरिक घरगुती गॅस मिळत नसल्याने हवालदिल झाले आहेत तर व्यावसायिक सिलेंडरचा पुरवठा सरकारने बंद केला असल्याने हॉटेल व्यावसायिकांवर हॉटेलला टाळे लावण्याची वेळ आली आहे. हॉटेल बंद झाल्यास त्यावर उपजीविका करणाऱ्या हजारो कर्मचाऱ्यांच्या रोजी रोटीचा प्रश्न निर्माण झाला आहे. घरगुती गॅस प्रमाणेच सिनजी गॅसचाही तुटवडा जाणवू लागल्याने सीएनजी पंपावर रिक्षा आणि वाहनांच्या देशखील रांगा पहायला मिळत आहे. गॅस तुटवड्यामुळे काही कंपन्यांनी आपले कामकाज बंद केले आहे एकूणच या युद्धाने देशातील नागरिक हैराण झाले आहेत. अर्थात हे होणारच होते याची पूर्व कल्पना सर्वांनाच होती. अमेरिका आणि अमेरिकेचे मित्र राष्ट्र असलेल्या देशांचे नाक दाबण्यासाठी इराणने हॉर्मुझची सामुद्रधुनी बंद केली त्यामार्गे भारतात येणारे इंधन पुरवठा थांबला. देशाच्या गरजेपैकी ६० टक्के एलपीजी गॅस आपण आयात करतो आणि त्यातील ८० टक्के आखाती देशातून हॉर्मुझमार्गे भारतात येतो. तो मार्ग बंद झाल्याने देशातील ३० टक्के गॅस पुरवठा बाधित झाला आहे. हे होणार होते याची कल्पना सरकारलाही होती मात्र सरकारने राखीव साठा किंवा पुरेशी पर्यायी व्यवस्था न केल्याचेच हे परिणाम आहेत. हे युद्ध कधी थांबेल हे कोणीही ठामपणे सांगू शकत नाही. हे युद्ध आणखी काही दिवस चालले तर यापेक्षा भीषण परिस्थिती निर्माण होऊ शकते म्हणून सरकारने पर्यायी व्यवस्था आणि सुरळीत पुरवठा अशा दोन्ही आघाड्यांवर युद्धपातळीवर पावले उचलण्याची गरज आहे.

# गेली १२ वर्षे 'कोमा'त असलेल्या हरीश राणाला इच्छामरण देण्यास कायदेशीर मान्यता



दीर्घकाळ कोमामध्ये असलेल्या रुग्णांच्या मानवी वेदना, कुटुंबीयांची मानसिक आणि आर्थिक झळ तसेच वैद्यकीय नैतिकतेचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. गेली तब्बल १२ वर्षे कोमामध्ये असलेल्या हरीश राणा यांना इच्छामरण देण्यास न्यायालयाने कायदेशीर मान्यता दिल्याची घटना समाजात आणि वैद्यकीय क्षेत्रात मोठ्या चर्चेचा विषय ठरली आहे. या निर्णयामुळे अत्यंत गंभीर आणि दीर्घकालीन आजारांनी त्रस्त रुग्णांच्या जीवनमरणाच्या प्रश्नावर पुन्हा एकदा प्रकाश पडला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अपघातानंतर हरीश राणा हे मागील १२ वर्षांपासून कोमामध्ये होते. अनेक वर्षांच्या उपचारांनंतरही त्यांच्या प्रकृतीत कोणतीही सुधारणा न झाल्याने कुटुंबीय प्रचंड मानसिक ताणाखाली होते. अखेर कुटुंबीयांनी न्यायालयात अर्ज करून इच्छामरणाची परवानगी मागितली होती. वैद्यकीय तज्ज्ञांच्या अहवालांचा विचार करून न्यायालयाने विशिष्ट अटींसह इच्छामरणास मान्यता दिली. भारतामध्ये इच्छामरणाचा प्रश्न अत्यंत संवेदनशील मानला जातो. याआधीही अशाच एका चर्चित प्रकरणात अरुणा शानबाग यांच्या प्रकरणानंतर इच्छामरणाबाबत देशात मोठी चर्चा झाली होती. त्या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर भारताचे सर्वोच्च न्यायालयाने निष्क्रिय इच्छामरणाला काही अटींसह मान्यता देत महत्त्वपूर्ण मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली होती.

तज्ज्ञांच्या मते, अशा प्रकरणांमध्ये रुग्णाची स्थिती, वैद्यकीय अहवाल, कुटुंबीयांची भूमिका आणि नैतिक बाबी यांचा अत्यंत काळजीपूर्वक विचार केला जातो. इच्छामरणाचा निर्णय हा केवळ वैद्यकीय नव्हे तर मानवी संवेदनांशी निगडित विषय असल्यामुळे न्यायालयेही अत्यंत सावधगिरीने निर्णय घेतात.

हरीश राणा यांच्या प्रकरणामुळे देशात पुन्हा एकदा इच्छामरणाच्या कायदेशीर चौकटीबाबत आणि रुग्णांच्या सन्मानाने जगण्याच्या हक्काबाबत चर्चा सुरू झाली आहे. जीवन आणि मृत्यूच्या या नाजूक सीमारेषेवर मानवी संवेदना, कायदा आणि वैद्यकीय विज्ञान यांच्यात संतुलन राखण्याचे मोठे आव्हान समाजासमोर उभे राहिले आहे.

दरम्यान, या निर्णयानंतर वैद्यकीय क्षेत्रातील अनेक तज्ज्ञांनी असे मत व्यक्त केले आहे की, अशा गंभीर अवस्थेत असलेल्या रुग्णांसाठी स्पष्ट कायदेशीर मार्गदर्शक तत्त्वे असणे आवश्यक आहे. यामुळे रुग्णांच्या सन्मानाचे रक्षण होण्याबरोबरच कुटुंबीयांनाही निर्णय घेण्यास मदत होऊ शकते. समाजातही या निर्णयाबाबत वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटत आहेत. काहीजण हा निर्णय मानवी वेदनांपासून मुक्ती देणारा असल्याचे मानतात, तर काहींच्या मते जीवनाचे संरक्षण हे सर्वोच्च मूल्य असल्याने इच्छामरणाबाबत अधिक सावध भूमिका घेणे गरजेचे आहे.

# युद्धाच्या झळा सर्वसामान्यांपर्यंत; सरकार मात्र शांत का?

❒ – सागर पिंगळे, पुणे.

आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धपरिस्थितीचे परिणाम आता हळूहळू जगभर जाणवू लागले आहेत. भारतासारख्या आयात-आधारित अर्थव्यवस्थेवर त्याचे थेट परिणाम होत आहेत. पेट्रोल-डिझेलचे दर, गॅसचा तुटवडा, कंटेनर अडकणे, आयात-निर्यात उशिरा होणे अशा अनेक समस्या निर्माण होत असताना सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी वाढत आहेत. मात्र या संपूर्ण परिस्थितीबाबत सरकारकडून स्पष्ट आणि प्रामाणिक माहिती दिली जात नसल्याची भावना समाजात वाढत आहे.

युद्धाचा सर्वात मोठा परिणाम ऊर्जा क्षेत्रावर होत आहे. आखाती देशांमधून येणाऱ्या कच्च्या तेलाचा पुरवठा आणि वाहतूक व्यवस्थेत अडथळे निर्माण झाल्याने इंधन आणि गॅसच्या उपलब्धतेवर परिणाम दिसू लागला आहे. अनेक ठिकाणी हॉटेल व्यावसायिक, छोटे उद्योग आणि वाहतूक व्यवसाय अडचणीत आले आहेत. खर्च वाढत आहे, पण उत्पन्न मात्र कमी होत आहे. याचा फटका थेट सर्वसामान्यांच्या खिशाला बसत आहे.

दुसरीकडे बंदरांमध्ये कंटेनर अडकणे, जहाजांची हालचाल उशिरा होणे आणि आयात-निर्यात प्रक्रियेत अडथळे येणे या समस्या वाढत आहेत. उद्योग आणि व्यापार क्षेत्रातील लोक याबाबत चिंता व्यक्त करत असले तरी अधिकृत पातळीवर परिस्थिती किती गंभीर आहे याबाबत स्पष्ट चित्र मांडले जात नाही. सरकारकडून दिले जाणारे निवेदन बहुतेक वेळा आश्वासक असते, पण वास्तव वेगळे असल्याचे उद्योग क्षेत्र सांगत आहे.

संकटाच्या काळात सरकारची सर्वात मोठी जबाबदारी म्हणजे नागरिकांना खरी परिस्थिती सांगणे आणि त्यासाठी पर्यायी उपाययोजना आखणे. पण माहिती दडवली गेली किंवा परिस्थितीची तीव्रता कमी दाखवली गेली तर त्याचा परिणाम उलट होतो. लोकांमध्ये अफवा पसरतात आणि असुरक्षिततेची भावना वाढते.

आज गरज आहे ती पारदर्शकतेची आणि दीर्घकालीन नियोजनाची. युद्ध किती काळ चालेल हे कोणालाही ठाऊक नाही. त्यामुळे ऊर्जा, व्यापार आणि पुरवठा साखळी यासाठी पर्यायी मार्ग शोधणे आवश्यक आहे. अन्यथा युद्धाच्या झळा केवळ सीमारेषांवरच नाही तर प्रत्येक घरापर्यंत पोहोचतील.

सरकारने परिस्थितीची खरी जाणीव करून देत ठोस उपाययोजना केल्या तरच सर्वसामान्य नागरिकांचा विश्वास टिकून राहील. अन्यथा युद्ध दूर असले तरी त्याचे परिणाम मात्र प्रत्येकाच्या दैनंदिन आयुष्यात जाणवत राहतील.


**PUBLIC NOTICE**

Whereas my clients **(1) Mrs. SMITA KASHINATH SALVI, (2) Mrs. SHARDA SAKHARAM SALVI** are interested in purchasing **FLAT NO- 530, 5th FLOOR, "G" WING,** in the building known as- **"SHAH ARCADE". M/S. SHAH ARCADE CHS LTD., PLOT NO- 4 & 5, SECTOR NO- 6, KHARGHAR, NAVI MUMBAI- 410 210, TALUKA- PANVEL, DISTRICT- RAIGAD** on ownership basis from **(1) Mr. VITHAL BALU KURLE, (2) Mrs. UJJWALA VITHAL KURLE (OWNERS).**

And whereas whosoever having any objection or right or claim or interest or charge or lien or mortgage etc., in any manner whatsoever, shall come and raise the objection within a period of 15 days from the date of publication of this notice with the undersigned or else my clients will proceed with such intentions and any claims in future will not be entertained.Given under my hands on ____ day of March, 2026.

Sd/-
**ABHISHEK SAXENA**
Advocate High Court
Off. No 01, Shreeraj Chs, Plot no 33, Sector 20, Kharghar, Navi Mumbai-410 210.
Ph- +91 8080430044

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that GIDWANI SAVITRI HASHU alias NEETA has changed her name and shall henceforth be known as GIDWANI SAVITRI HASHU. Further the change of name has been duly acknowledged and recorded vide issuance of UIDAI No. 6264 7444 5801 in the name of GIDWANI SAVITRI HASHU.

**PUBLIC NOTICE**

KNOW ALL MEN BY THESE PRESENTS that originally **Mr. Yadav Muklal Ramswarup** was lawful owner of Flat No.**Flat No. 405, 4th Floor, Gaurishankar SRA CHS. LTD., Building No.1, Masrani Lane, Halav Pool, Kurla (West), Mumbai – 400070, adm. 269 Sq. Ft. Carpet area**, which was allotted to him under SRA Scheme from Star Enterprises Builders & Developers on dated 23.08.2013 in lieu of his old room premises which is eligible in Annexure – II at Sr. No. 12 issued by MHADB. That said **Mr. Yadav Muklal Ramswarup** died on 18/11/2019 and after his death, his wife **Smt. Umrai Muklal Yadav** had applied for Membership accordingly to SRA and the SRA vide their Letter for Legal Membership in favour of **Mrs. Umrai Muklal Yadav** on dated 05/04/2022. That said **Smt. Umrai Muklal Yadav** died on 12/12/2023, leaving behind her **Mr. Basantlal Yadav** (Son) as his only legal heir to use, acquire and inherit the said flat as sole owner thereof and after death of **Late Umrai Muklal Yadav,** her son **Mr. Basantlal Yadav** is in use, occupation of the said flat. That said **Mr. Basantlal Yadav** has sold / transferred the said flat to my client **Mr. Jail Singh,** by way of registered Sale Deed dt. 13.11.2025 vide document No. MUMBAI-28/21496/2025 dated 13.11.2025 on ownership basis and since then my client i.e. **MR. JAIL SINGH** is in use, occupation and possession of the said flat premises as sole owner thereof.

Any persons claiming any right or share whatsoever by way of ownership, mortgage, pledge, lien, charge, inheritance, etc. in the said Flat should intimate the undersigned in writing with supporting documents in respect of his/her claim, within 14 days of publication of this Public Notice, failing which, the claim or claims if any of such person or persons will be considered to have waived and/or abandoned.

Place : Mumbai Date :14.03.2026
**Jitendra Kumar Tripathi** (Advocate High Court)
Office: Chhabinath Pandey Chawl, New Airport Road, Marol Naka, Andheri (East), Mumbai - 400 059.

**पनवेल महानगरपालिका**
**ई-निविदा नोटीस**

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुभवी व्यक्ती, संस्था, ठेकेदार, किंवा कंपनी यांचेकडून ई-निविदा पद्धतीने निविदा मागवीत आहेत. कोरा निविदा फॉर्म https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. १३/०३/२०२६ ते दि. २३/०३/२०२६ पर्यंत दुपारी ०३.०० पर्यंत उपलब्ध राहणार आहेत. सदरच्या जाहीर ई निविदा संकेतस्थळावर दि. १३/०३/२०२६ ते दि. २३/०३/२०२६ पर्यंत दुपारी ०३.०० वाजेपर्यंत ऑनलाईन कार्यप्रणाली व्दारे स्विकारण्यात येतील.

| अ. क्र. | कामाबाबत तपशील | कामाची मुदत | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती 'अ' हद्दीत आपत्कालिन परिस्थितीत व पावसाळ्यापूर्वी नाले साफसफाई करणे. | ०२ वर्ष | रु.४,१९,२११/- |
| २ | पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती 'ब' हद्दीत आपत्कालिन परिस्थितीत व पावसाळ्यापूर्वी नाले साफसफाई करणे. | ०२ वर्ष | रु.२,९३,११२/- |
| ३ | पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती 'क' हद्दीत आपत्कालिन परिस्थितीत व पावसाळ्यापूर्वी नाले साफसफाई करणे. | ०२ वर्ष | रु.१.६४,५९९/- |
| ४ | पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती 'ड' हद्दीत आपत्कालिन परिस्थितीत व पावसाळ्यापूर्वी नाले साफसफाई करणे. | ०२ वर्ष | रु.२,३९,८१५/- |

सही/-
अतिरिक्त आयुक्त
पनवेल महानगरपालिका

**PUBLIC NOTICE**

All concerned are informed by this Public Notice that my client M/s Concept Manufacturing Services, through Proprietor Mr.Navneet K. Mohta, owner of Commercial Premises being Unit No. 903, 9th Floor, KANAKIYA ATRIUM-2, CTS No.228, Village Mulgaon, Taluka Andheri, Cross Road-A, Chakala, MIDC, Andheri (East) Mumbai 400093, adm area 820 Sq. ft., by Sale Deed, on dated 25/09/2017, bearing Document No.9353/2017, Asst. Registrar Andheri-3, and now said Mr.Navneet K. Mohta Proprietor of M/s Concept Manufacturing Services, being Owner of said premises decided to Sell, transfer and assign all his rights and interest in respect of said premises to other persons.

All the person/s, Government authorities, Banks, Financial institutions, etc. are hereby called upon that if there is any claim whatsoever pertaining to said premises, send claim within 14 days from the date of this notice to me or to my client otherwise it will be deemed that there is no claim at all in the said premises and no claim will be entertained thereafter.

Date: 13.03.2026
Sd/-
**Rajesh Sharma,**
**(Advocate)**
Shop No.6, Bldg.No.B-10, Rashmi Star City, Naigaon (East) Dist. Palghar 401208

**अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालय**
**जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१**
दुरध्वनी क्र.:- ०२२-२२६१००१३ ई-मेल :- addcollmumbai@gmail.com

**जाहिर नोटीस ( अपील क्र. ११५४/२०२५)**

**उषा आनंद जुईकर** .......अपिलार्थी
**विरुध्द**
**सहायक आयुक्त जी / दक्षिण विभाग व इतर ०३** .......उत्तरार्थी
**प्रति,**
**१. अध्यक्ष सचिव**
श्री. विघ्नहर्ता सहकारी गृहनिर्माण संस्था,
गणेश नगर नं. ०१, स्टॅन्डर्ड मिल लेन प्रभादेवी,
मुंबई- ४०० ०२५. .......(उत्तरार्थी क्र. २)
**२. रघुनाथ बाळाराम जुईकर**
रुम नं. ७/२/२/ ए, सर्वे नं. ४७, गणेश नगर नं. १,
स्टॅन्डर्ड मिल लेन प्रभादेवी,
मुंबई- ४०० ०२५. .......(उत्तरार्थी क्र. ४)

सदर जाहिर नोटीसी द्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे विघ्नहर्ता सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परिशिष्ट - २ मधील झो. क्र. ४७ वर पात्रता करणेकामी अपील अर्ज दाखल केला आहे. सदर अपील प्रकरणात आपणांस उत्तरार्थी क्र. ०४ केले आहे. तसेच अपिलार्थी यांनी संस्था यांना उत्तरार्थी क्र. ०२ केले आहे. प्रकरणी दि. १०.१२.२०२५ रोजीचे सुनावणी मध्ये आपण गैरहजर असल्याने मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहेत.

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये आपण उत्तरार्थी क्र. ०२ व ०४ असून दि. २५/०३/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. तरी सदर सुनावणीस आपण उपस्थित /हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

शिक्का
**सहाय्यक महसुल अधिकारी**
**अपर जिल्हाधिकारी कार्यालय,**
**मुंबई शहर**

**बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda**

**बँक ऑफ बडोदा**
**नवी मुंबई प्रादेशिक कार्यालय :** ४०५, चौथा मजला, प्लॅटिनम टेक्नो पार्क, कर्नाटका भवन समोर, रघुलीला मॉलच्या मागे, वाशी ४०० ७०२.
**ई-मेल :** recovery.navimumbai@bankofbaroda.co.in

**स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना – परिशिष्ट ४-ए (नियम ८(६) आणि ९(२) मधील तरतूद)**

**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना, ज्यामध्ये सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(६) आणि ९(२) च्या तरतुदींचा समावेश आहे.**

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदारांना आणि जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की, बँक ऑफ बडोदाच्या अधिकृत अधिकाऱ्याने, सुरक्षित कर्जदारांना खाली वर्णन केलेले स्थावर गहाणखत/शुल्क, ज्याचा ताबा सुरक्षित कर्जदारांना देण्यात आला आहे, तो जसे आहे तिथे आहे, जसे आहे जे आहे आणि खाली नमूद केलेल्या खात्यांच्या वसुलीसाठी जे काही आधार आहे ते या आधारावर विकला जाईल. कर्जदार/जामीनदार/प्रतिभूत मालमत्ता/ थकबाकी/ राखीव मूल्य/ई-लिलाव तारीख आणि वेळ, ईएमडी आणि बोली वाढीची रक्कम यांचे तपशील खाली नमूद केले आहेत –

| अनु. क्र./ लॉट क्र. | कर्जदार/जामीनदार/तारणदारांचे नाव आणि पत्ता | कर्जदार /हमीदार यांचे नाव व पत्ता स्थावर मालमत्तेचे विवरण ज्ञात अडथळे, काही असल्यास | एकूण थकबाकी | ई-लिलाव तारीख व वेळ | (१) राखीव किंमत आणि (२) मालमत्तेची ईएमडी रक्कम (३) बोली वाढ रक्कम | ताबा अहवाल (बांधकामात्मक/ प्रत्यक्ष) | मालमत्ता पडताळणी तारीख व वेळ/ संपर्क व्यक्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कर्जदार : श्री. प्रदीप बिहारीलाल पांडे सह-कर्जदार – श्रीमती सोमवती बिहारीलाल पांडे पत्ता – फ्लॅट क्रमांक १२०६, ए-विंग, पनवेलकर उत्सव, फेज-१, गाव वालीवली, तालुका अंबरनाथ, जिल्हा ठाणे – ४२१५०३ | पनवेलकर उत्सव, फेज-१, मोज. १८.६३ चौरस मीटर (कार्पेट क्षेत्र) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रकल्पाच्या ए-विंगमधील १२ व्या मजल्यावरील फ्लॅट क्रमांक: १२०६, मालमत्तेचा तो सर्व भाग आणि पार्सल, वालीवली, तालुका अंबरनाथ आणि जिल्हा ठाणे येथे स्थित, गट क्रमांक १ हिस्सा क्रमांक १,२,३,४ आणि गट क्रमांक २. पिन क्रमांक ४२१५०३ बिल्ट अप एरिया – १८.६३ चौरस मीटर. बँकेस ज्ञात अडथळे – शून्य | ०८.०३.२०२६ रोजी रु. १५,१७,९४१.१६ आणि त्यावरील इतर प्रभार | २२.०४.२०२६ दुपारी ०२:०० ते संध्याकाळी ०६:०० पर्यंत | १. रु. १७,००,०००/- २. रु. १,७०,०००/- ३. रु. ५०,०००/- | प्रतिकात्मक | १६.०४.२०२६ रोजी ११.०० ते २.०० पर्यंत श्री. चदला प्रेमचंद-८९७६८२६५८० |

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, कृपया https://www.bankofbaroda.in/e-auction.htm ही वेबसाइट लिंक आणि ऑनलाइन लिलाव पोर्टल https://baanknet.com पहा/भेट द्या. तसेच, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्यांशी दूरध्वनी क्रमांक ०२२-२७८१०६७० मोबाईल ९७५४६८४५४१ वर संपर्क साधू शकतात.

**तारीख:** १३.०३.२०२६
**ठिकाण:** वाशी, नवी मुंबई

सही/-
अधिकृत अधिकारी,
बँक ऑफ बडोदा